मेसर्स असोसिएटेड जर्नल्स प्रा.लि.या संस्थेस मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे बांद्रा, ता.अंधेरी येथील स.नं. ३४१ पैकी (न.भू.क्र.६०८ पैकी) वाटप करण्यात आलेल्या शासकीय भूखंड प्रकरणी अनेक प्रकारच्या अनियमितता झाल्याबाबत प्राप्त तक्रारीची चौकशी करण्याकरीता एक सदस्यीय समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. गोपनि-२०१५/प्र.क्र.३७५/ल-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १४ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना:-

विविध वृत्तपत्रांच्या पत्रकारांनी त्यांना माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, मेसर्स असोसिएटेड जर्नल्स प्रा.लि. या संस्थेला वाणिज्यिक प्रयोजनार्थ मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे बांद्रा, ता.अंधेरी येथील स.नं. ३४१ पैकी (न.भू.क्र.६०८ पैकी) वाटप करण्यात आलेल्या शासकीय भूखंड प्रकरणी अनेक प्रकारच्या अनियमितता झाल्याबाबत तक्रार केली आहे.

उक्त तक्रारीची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय चौकशी स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:-

मेसर्स असोसिएटेड जर्नल्स प्रा.लि. या संस्थेला वाटप करण्यात आलेल्या शासकीय भूखंड प्रकरणी अनियमित वाटप, वाटपानंतर सदर संस्थेने केलेले अटी व शर्तीचे उल्लंघन तसेच संस्थेस विकासासाठी देण्यात आलेल्या मुदतवाढ परवानग्या व त्यामुळे झालेले शासनाचे नुकसान याबाबत व अनुषंगिक कायदे व नियम यांचे उल्लंघन याविषयी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने यासंदर्भात चौकशी करून शासनास वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याकरीता श्री.गौतम चॅटर्जी, विद्यमान अप्पर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग यांची “एक सदस्यीय चौकशी समिती” नियुक्त करण्यात येत आहे.

०२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

२.१ प्रस्तुत प्रकरणी निवासी भूखंडाचे वाणिज्यिक प्रयोजनार्थ वाटप करीत असतांना कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली आहे किंवा कसे ? याची शहानिशा करणे.

२.२ ज्या अटी व शर्तीच्या आधारे या भूखंडाचे वाटप करण्यात आले त्या अटी व शर्तीचे संबंधित संस्थेकडून उल्लंघन झाले आहे का ? व असल्यास, यामुळे शासनाचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे ? याची तपासणी करणे.

२.३ ह्या भूखंडाच्या विकासासाठी वेळोवेळी देण्यात आलेली मुदतवाढ व ज्या अटींवर मुदतवाढ, देण्यात आली त्यामध्ये व महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी अनुज्ञेय करतांना कुठल्याही नियमांचे उल्लंघन किंवा शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे किंवा कसे ? याची शहानिशा करणे.

२.४ या संपुर्ण प्रक्रियेमध्ये एकंदरीत जमीन महसूल विषयक कायदे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम, १९६६ व इतर अनुषंगिक कायदे/नियम यांचे उल्लंघन झाले आहे का ? व त्यामुळे शासनाच्या आर्थिक हितास बाधा पोहोचली आहे किंवा कसे ? याची तपासणी करणे.

२.५ वरील प्रकरणी चौकशी पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा आर्थिक नुकसान झाल्याचे आढळल्यास याबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करणे.

२.६ या प्रकरणी शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे ते भरून काढण्यासाठी करावयाची उपाययोजना सुचविणे.

०३. सदर एक सदस्यीय समितीने या प्रकरणी चौकशी पूर्ण करून एक महिन्यात अहवाल शासनास सादर करावा.

०४. या एक सदस्यीय चौकशी समितीस या प्रकरणी सर्व संबंधित शासकीय विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर प्राधिकरणांच्या अधिकारी/कर्मचारी यांना चौकशीसाठी बोलाविण्याचे तथा कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याचे अधिकार राहतील.

०५. सदर समितीचे मुख्यालय मुंबई येथे राहील. सदर समितीस विभागीय आयुक्त, कोकण विभाग आणि जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी आवश्यक तो अधिकारी/कर्मचारी वर्ग, कार्यालयीन सुविधा (उदा. दूरध्वनी,स्टेशनरी,संगणक इत्यादी साहित्य) व आवश्यकतेनुसार वाहन उपलब्ध करून द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१३०१३८६८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2016.01.15 13:02:46 +05'30'

(विलास थोरात)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
६) अपर मुख्य सचिव (परीवहन) गृह विभाग, मंत्रालय मुंबई-३२
७) प्रधान सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२
८) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

९) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, वांद्रे, मुंबई.
१०) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई.
११) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, (२) नागपूर.
१२) निवडनस्ती कार्यासन (ल-१).